उन्नती संस्था
सामाजिक आणि शैक्षणिक बदलासाठी



# वार्षिक अहवाल २०२४-२५

www.unnati-isec.org

# संचालकांचे मनोगत

२०१४ साली आम्ही अकोला जिल्यात केवळ एका साक्षरता विकास कार्यक्रमापासून आमचा प्रवास सुरू केला. चुका करत, शिकत, अवघड वाटेवरचा प्रवास करत अकरा वर्षांनंतर आज उन्नती अकोला आणि ठाणे जिल्ह्यांमध्ये चार कार्यक्रम राबवत आहे.

यंदाचे वर्ष आमच्यासाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरले आहे. प्राथमिक वर्गांसाठी आमचा बहुभाषिक शिक्षण दृष्टिकोन जवळपास नऊ वर्षे विकसित केल्यानंतर, यावर्षी आम्ही शाळांतील शिक्षकांना या मॉडेलचे औपचारिक प्रशिक्षण देण्यास प्रारंभ केला. अधिकाधिक मुलांपर्यंत हा दृष्टिकोन पोहोचावा आणि त्यांना त्याचा लाभ व्हावा, हीच आमची दीर्घकालीन दृष्टी आहे.

“सातत्यपूर्ण क्षमता-वृद्धी” हे आमचे मार्गदर्शक तत्त्व कायम आहे. केवळ याच वर्षात आमच्या टीमने ४७ विषयांवरील ६९ प्रशिक्षणांमध्ये सहभाग नोंदवून आपली दृष्टी आणि कार्यपद्धती अधिक सक्षम केली आहे.

शहापूरच्या आफिर (शाळा वाचनालय) प्रकल्पाचा सर्व संघ बहुतांश ग्रामीण भागातून आलेल्या महिलांचा आहे याचे आम्हाला कायमच कौतुक आणि अभिमान आहे. "आम्ही बाहेर कुठेही प्रवास करणार नाही, नोकरी सोडून देऊ" अशा भूमिकेतील या महिला आपल्या कामाशी इतक्या समरस झाल्या की वर्षभरातच भोपाळ बिहार इथे प्रशिक्षणासाठी एकटीने प्रवास करून गेल्या. आयुष्यात प्रथमच एकटीने रेल्वेचा प्रवास केल्याने त्यांची हिम्मत जी वाढली ती वर्णन करता येणार नाही.

सांगण्यासारख्या बऱ्याच गोष्टी मनात आहेत, पण कागदावरची जागा मर्यादित आहे.

या सर्व प्रवासात विविध दात्यांचे मोठे योगदान आहे. संस्था देणगीदारांचा आम्ही या अहवालात उल्लेख केला आहे. परंतु व्यक्ती देणगीदारांचा मात्र उल्लेख करता आलेला नाही. पुढील अहवालात सुधारणा करू.
संस्थेसाठी स्वयंसेवकांची फळी उभी करावी अशी अनेक वर्षांपासूनची इच्छा आहे, परंतु आमचा दुर्गम भाग बघून स्वयंसेवक मिळत नाहीत. ही कोंडी कशी फोडावी हा सध्या प्रश्न आहे.

तर अशा या प्रवासाचा वर्षभरातील वृत्तान्त या अहवालाच्या माध्यमातून आपल्यापर्यंत पोहोचवत आहे. अहवालाला पानांची मर्यादा असल्याने, जे कार्य केले त्याच्या केवळ २० टक्केच इथे नोंदवता आले आहे. आपण तो वाचाल अशी आम्हाला आशा आहे.

संस्थेच्या कामाला जरूर भेट द्या, जोडून घ्या, जोडले रहा.

आपली विश्वासू,

हेमांगी जोशी
संस्थापक संचालक

# उन्नतीचे काम

**The Cause:**
Approximately 35% of children struggle with learning difficulties due to disparities between home and school languages, particularly in tribal areas. Addressing this issue through Multilingual Education (MLE) is essential for integrating children into scheduled languages, which aligns with the Sustainable Development Goals (SDG 2030) and supports our National Objectives.

Source: ABSS_2025_MKMSG.PDF

AKHIL BHARATIYA SIKSHA SAMAGAM MINISTRY OF EDUCTION AND LITERACY , GOVT OF INDIA

आमच्या कार्यक्रमांचे लक्ष दोन महत्वाच्या क्षेत्रांवर केंद्रीत आहे:



**१. सक्षमीकरणासाठी साक्षरता:**
महाराष्ट्रातील आदिवासी समुदायातील मुलांच्या साक्षरतेत आणि शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. साक्षरता कौशल्यांचा विकास करून आम्ही या मुलांना त्यांची शैक्षणिक तसेच सामाजिक प्रगती करण्यासाठी समर्थ बनवतो.



**२. सशक्तीकरणासाठी वाचनालय कार्यक्रम:**
शालेय व गाव वाचनालय उपक्रमांच्या माध्यमातून आम्ही विद्यार्थ्यांच्या सक्षमीकरणास चालना देतो.
सर्व उपक्रमांमध्ये बहुभाषिक शिक्षण (MLE) दृष्टिकोनाचा समावेश करून तसेच महिला सक्षमीकरणाला केंद्रस्थानी ठेवून आम्ही आमचे कार्यक्रम सर्वसमावेशक, संवेदनशील आणि परिणामकारक ठरतील याची सुनिश्चिती करतो.

## स्वप्न

**भारतीय संविधानाने आश्वस्त केल्यानुसार प्रत्येक व्यक्तीस सन्मानपूर्वक जीवन जगता यावे.**

## ध्येय

**औपचारिक शालेय शिक्षण तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा मुलभूत अधिकार सर्व मुलांना उपलब्ध व्हावा.**

# उन्नती विषयी

उन्नती ही स्वयंसेवी संस्था महाराष्ट्रातील सार्वजनिक शाळांमध्ये बहुभाषिक शिक्षण (MLE) दृष्टिकोनाची प्रवर्तक असून विविध भाषा आणि जीवनानुभवांचा समावेश असलेल्या शिक्षणाचा पुरस्कार करते. आमचे कार्य प्रामुख्याने वंचित आणि सेवा-अभावित समाजघटकांसाठी **शिक्षण, युवा-विकास आणि समुदाय विकास** या क्षेत्रामध्ये चालते. या प्रक्रियेत, आम्ही दीर्घकालीन बदलाची भक्कम पायाभरणी करत भूक, दारिद्र्य आणि उपजीविका यांसारख्या समस्या कमी होण्यासाठी अप्रत्यक्षरीत्या योगदान देतो.
आदिवासी भागातील ६–२१ वयोगटातील मुले व युवा, तसेच त्यापुढील वयाच्या प्रौढ व्यक्ती या आमच्या भागधारक आहेत. आम्ही शाळा, शिक्षक आणि स्वयंसेवी संस्थांशी (NGOs) सहयोग करीत शिक्षण गुणवत्ता सुधारण्यासाठी कार्य करतो.

## मूल्ये

**आम्ही न्याय्य आणि समतामूलक समाज निर्मितीसाठी प्रयत्नशील आहोत. हे साध्य करण्यासाठी सुरक्षित, सर्वसमावेशक वातावरणाचे संवर्धन करत संघकार्य, सहभाग, सचोटी, प्रेम आणि परस्पर सन्मान यांना उत्तेजना देतो.**

## उद्दिष्ट

१. कोणतीही सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक पार्श्वभूमी असलेल्या बालकाकडे शिक्षण घेण्याची क्षमता असतेच हा विश्वास घेऊन सर्व मुलांना गुणवत्ता पूर्ण शिक्षणाचा मुलभूत अधिकार मिळावा या साठी काम करणे.

२. जगण्याचा, संरक्षणाचा, विकास आणि सहभाग हे मुलांचे अधिकार प्रत्यक्षात येण्यासाठी सुयोग्य वातावरण निर्माण व्हावे यासाठी काम करणे.

३. मुले, युवक व महिला यांच्यातील उद्योजक वृत्तीच्या आणि कौशल्याच्या विकासासाठी वातावरण तयार करणे.



उन्नती संघ

# कामाची व्याप्ती

भौगोलिकदृष्ट्या उन्नतीचे काम महाराष्ट्रातील दोन आदिवासी बहुल ठिकाणी चालते –


**अकोट तालुका**
(विदर्भातील अकोला जिल्हा)

**शहापूर तालुका**
(मुंबईजवळील ठाणे जिल्हा)




महाराष्ट्रातील प्रकल्प क्षेत्र

या वर्षी आम्ही या घटकांसोबत काम केले.



# उन्नतीचे कार्यक्रम




**शिकू आनंदे (साक्षरता विकास)**

लोक समुदाय : **कोरकू आदिवासी जमात**

वयोगट: -**६ ते १० वर्षे**

**अकोट तालुक्यातील आदिवासी क्षेत्र**



**गाव वाचनालय**

लोक समुदाय : **कोरकू आदिवासी जमात**

वयोगट: **१ ते ८० वर्षे**

**अकोट तालुक्यातील आदिवासी क्षेत्र**



**किशोरींचे नेतृत्व विकसन (LC)**

लोक समुदाय : **कोरकू आदिवासी मुली/ युवती**

वयोगट : **१० ते १९ वर्षे**

**अकोट तालुक्यातील आदिवासी क्षेत्र**



**शाळा वाचनालय**

लोक समुदाय : **कोरकू, कातकरी, वारली आणि ठाकर आदिवासी जमात**

वयोगट: **९ ते १४ वर्षे**

**शहापूर तालुक्यातील आदिवासी आश्रमशाळा**

# शिकू आनंदे (साक्षरता विकास)

कार्यक्रम १




प्राथमिक वर्गांमध्ये शिक्षण घेणाऱ्या आदिवासी समुदायातील मुलांच्या साक्षरता व भाषिक कौशल्य विकसनासाठी बहुभाषिकतेचा दृष्टीकोन व पद्धतीचे प्रतिमान (मॉडेल) तयार करणे व त्याचा प्रसार करणे. हे शिकू आनंदे कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यातील ४ आदिवासी बहुल गावात उन्नती संस्था मागील तीन वर्षांपासून शिक्षणाच्या क्षेत्रात काम करत आहे. गावातील जिल्हा परिषद शाळेत इयत्ता तिसरी ते सहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी संस्थेचे वर्ग चालवले जातात.

उन्नती संस्था मुलांच्या मातृभाषा आधारित साक्षरता शिक्षणावर काम करते. मुलांची मातृभाषा हि त्यांची ओळख आहे. या ओळखीचा वापर करून मुलांना वाचन लेखनाला जोडून घेतले कि नक्कीच त्याचा फायदा मुलांना नि शिक्षकांना अध्ययन अध्यापन प्रक्रिया करताना होतो. तसेच, भाषेत मोठ्या प्रमाणत साहित्य असले कि मुलांना सहज पद्धतीने वाचनास प्रवृत्त होण्यास मदत मिळते. तसेच मुलांसोबत काम करत असतांना केवळ अध्ययन अध्यापन एवढेच काम नाही. तर मुबलक प्रमाणात मुलांच्या भाषेत कोरकू बालसाहित्य तयार करणे हे सुद्धा मुख्य काम संस्था करत असते. जेणेकरून मोठ्या संख्येने कोरकू बालसाहित्य निर्मिती होईल.

**या अंतर्गत झालेले उपक्रम:**

**अ) जिल्हा परिषदेच्या ४ शाळांमध्ये वर्षभर आठवड्यातील ५ दिवस भाषा वर्ग घेतले गेले-**




**ब) शाळांमधील शिक्षकांसोबत काम-** शिक्षकांना सक्षम करण्यासाठी प्रशिक्षण घेणे हे महत्वाचे आहे. त्यामुळे संस्थेने पाच दिवसीय निवासी बहुभाषिक शिक्षण याविषयावर प्रशिक्षण आयोजित केले होते. प्रशिक्षणानंतर प्रशिक्षित झालेले प्रशिक्षणार्थी सोबत दरमहा एक दिवसीय अभ्यासगट चालवला गेला. ज्यात बहुभाषिक प्रशिक्षणातील सत्राचा सराव करत आहे.

ज्या शिक्षकांनी हँडहोल्डिंग मदत मागितली अशा शिक्षकांसोबत जोडून घेतले. ज्या शिक्षकांना हँडहोल्डिंगची गरज नाही अशाही शिक्षकांशी आभासी माध्यमाद्वारे, फोनकॉलद्वारे संपर्क जोडून ठेवला. रुइखेड केंद्रातील ४ जिल्हापरिषद शाळेतील शिक्षकांसोबत नियोजन सादरीकरण सभा उपक्रम सुरु ठेवण्यात आला.

# शिकू आनंदे (साक्षरता विकास)



१. **शिक्षक प्रशिक्षण** - ‘**मुलांची कोरकू भाषा व शाळेतील मराठी भाषा - अध्ययन-अध्यापनाची दिशा**’ या विषयावर ५ दिवसीय निवासी प्रशिक्षण गांधी आश्रम परिसर, सेवाग्राम येथे उन्नती संस्थेने आयोजित केले होते.
या प्रशिक्षणामध्ये कोरकू भाषक मुलांना शिक्षण कसे द्यावे या मुद्द्यावर विविध सत्रे झाली. वैशिष्ट्ये, भाषा व बोलीभाषेतील फरक, बोलीभाषांचे व्याकरण, प्राण्यांची भाषा असते का, अधिकृत भाषा म्हणजे काय, भाषांचे श्रेष्ठत्व आणि कनिष्ठत्व कसे ठरते, भाषा व विचार यांचा संबंध, बहुभाषिकता आणि शिक्षणातील तिचे महत्त्व अश्या विषयावर चर्चासत्रे झाली. ऐकणे, बोलणे, वाचणे आणि लिहिणे या साक्षरतेच्या चार प्रमुख घटकांवर आधारित सत्रांमध्ये बहुभाषिक मुलांसाठी उपयुक्त शिक्षणपद्धती व भाषिक दृष्टिकोन यावर सखोल मार्गदर्शन संस्थेच्या संचालक हेमांगी जोशी व शलाका देशमुख यांनी केले.




या कार्यशाळेत अमरावती व अकोला जिल्ह्यातील जिल्हा परिषद व आश्रमशाळांतील शिक्षक, स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते आणि काही रिसर्च स्कॉलर असे २२ सहभागी होते. तसेच संस्थेचे ११ कार्यकर्तेही उपस्थित होते. प्रशिक्षण संपल्यानंतर १२ शिक्षकांनी संस्थेकडे मार्गदर्शनासाठी इच्छा व्यक्त केली. संस्थेने या शिक्षकांसोबत जवळून काम करण्याचा निर्णय घेतला.

२. **शिक्षक सभा** - शिक्षक प्रशिक्षणानंतर शिक्षक सभा ही २ वेळा आभासी स्वरूपात झाली. त्यामध्ये ऑक्टोबर आणि जानेवारी या दोन महिन्यांमध्ये २ सभा झाल्या. या आभासी सभेमध्ये अभ्यासगटाचे नियोजन, शिक्षक प्रशिक्षण आढावा व अभ्यास दौऱ्याचे नियोजन करण्यासाठी चर्चा झाली.
३. **अभ्यासगट** - शिक्षक प्रशिक्षणातील शिक्षकांसोबत वर्षभरात एकूण ५ अभ्यासगट चालवण्यात आले. बहुभाषिक शिक्षण या विषयात आम्ही आत्मसात केलेले ज्ञान व शिक्षकांना वर्गातून मिळणारे ज्ञान यांचे आदान-प्रदान होणे व याचा शाळेत अध्यापनामध्ये उपयोग होण्यास मदत करणे हा शिक्षक अभ्यासगटाचा उद्देश होता. मुलांसोबत काम करतांना आलेल्या अडचणीवर चर्चा केली गेली.
४. **शिक्षण परिषद सहभाग** - तालुक्यातील शाळांच्या प्रत्येक केंद्रामध्ये शिक्षण परिषद केंद्रप्रमुख यांच्यामार्फत घेतली जाते. वर्षातून किमान तीन परिषदा होणे अपेक्षित असते. मात्र या शैक्षणिक सत्रात एक वेळा अशी परिषद झाल्याने एकच वेळा उन्नती संस्थेने सहभाग घेतला, ज्यामध्ये निपुण भारत GR विषयी चर्चा करण्यात आली.
५. **शिक्षकांसोबत नियोजन सादरीकरण सभा** - शाळेतील शिक्षकांसोबत दर सोमवारी वर्गाचे नियोजन सादर केल्या गेले. नियोजनात या आठवड्यात काय व कसे अध्यापन करणार, कोणत्या सत्रात कोणती भाषा वापरली जाणार, मुलांची शैक्षणिक प्रगती काय आहे हे शिक्षकांना माहिती व्हावे शिवाय त्यांनी सुद्धा यातून त्याच्या वर्गात एखादी आवडलेली कृती घ्यावी. आणि नियोजनात त्यांनी सुद्धा काही सुचवावे. हा या सभेचा उद्देश होता.

**क) शैक्षणिक साहित्य विकसन -** अक्षर चित्र, अक्षर चित्र पझल्स, शब्दचक्र, शब्द सरकपट्टी , जोडाक्षरी शब्दांची मेणबत्ती, चौदाखडी वाचूया, सुरू थांबा, इत्यादी अनेक प्रकारचे शैक्षणिक साहित्य या वर्षी कोरकू भाषेत डिझाईन करून छपाई करून घेतले. या साहित्याचा वापर वर्गात तर केला जातोच पण शिक्षक प्रशिक्षणात सुद्धा याचा वापर केला गेला. डोरस्टेप स्कूल, पुणे यांच्याकडून प्रेरणा घेऊन हे साहित्य तयार केले.

# शिकू आनंदे (साक्षरता विकास)



### नैना कोरकू भाषेत शिकायला लागली...




**आमच्या वर्गात जेव्हा मिश्र समाजाची मुले असतात तेव्हा कोरकू मुलांना मराठी यावी अशी अपेक्षा असते. ती रास्तच आहे. पण बिना-कोरकू, म्हणजे मराठी भाषक मुलांना आपल्या परिसरातील कोरकू भाषा यावी असा आग्रह शाळा करत नाहीत. आमचा मात्र तसा आग्रह असतो.**
**कोहा वर्गातील नैना दुसरीला शिकते. ती गवळी समूहाची असून तिला कोरकू भाषा बोलता येत नाही. आमच्या वर्गात मात्र मराठी सोबतच कोरकू आणि हिंदीही वापरले जाते. शिक्षक दादाने चिकाटी न सोडता कोरकू भाषेचा वापर सुरूच ठेवला. आता मात्र तिला भाषेतील शब्दांचा अर्थ समजायला लागला आहे. नाम आणि क्रियापदाचा वापर करत तिला वाक्य सुद्धा कोरकू भाषेत बनवता यायला लागले आणि यामुळेच तिला कोरकू भाषा समजण्यासाठी मराठी भाषेची मदत झाली. कोरकू मुलांसोबत गटात काम करते, कोरकू भाषेतील पुस्तकांचे वाचन करते. ती आता कोरकू मुलांसोबत गप्पाही मारते.**

**चाचणी**

मुलांच्या शिकण्याचे व वर्गातील स्वतःच्या कामगिरीचे मूल्यमापन करणे गरजेचे असते. वर्षातून दोनदा आम्ही हे मूल्यमापन करत असतो. उन्नतीचे शिकू आनंदेच्या तीन वर्गातील मुलांची वाचनाची आणि लेखनाची अर्धवार्षिक चाचणी घेण्यात आली. कोरकू व मराठी भाषेमध्ये प्रश्न विचारले होते व उत्तरे कोणत्याही भाषेत लिहिण्याची मुभा होती. अन्य एक वर्ग सप्टेंबर महिन्यातच सुरु झाल्याने येथील मुलांची चाचणी घेतल्या गेली नाही.
चाचणीच्या निकालावरून पुढील कामाचे निर्णय घेण्यात आले.

जसे - जनुना व खीरकुंड बु. वर्ग १ या दोन्ही वर्गातील मुले साक्षरतेत पुढे गेली असल्याने त्यांना वाचनाच्या जास्तीत जास्त संधी मिळाव्या याकरिता नोव्हेंबर महिन्यापासून वाचनालय सुरु करून वाचनाशी निगडीत उपक्रम सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच कोहा येथील इयत्ता पहिली व दुसरीच्या मुलांसोबत शिकू आनंदे वर्ग सुरु करण्यात आले.
चाचणी निकाल पुढीलप्रमाणे -




> **वर्गात गाणे घेताना मुलांना मराठी भाषा जमत नाही. त्यामुळे मुले कोरकू भाषेत गाणे घेतली कि जास्त प्रमाणात रमून जाते आणि मुलांना ते गाणे समजते आणि म्हणायलाही सोप जाते त्यामुळे मुले तिकडे खूप आनंदी असतात. असे गाणे मुलांच्या तोंडात पण लवकर बसते.**
> **-तिकाराम बेलसरे (सुलभक)**

# गाव वाचनालय

कार्यक्रम २

या कार्यक्रमांतर्गत गावांमध्ये प्रत्यक्ष लोकांच्या कुटुंबापर्यंत जाऊन पुस्तक देवघेव प्रक्रिया राबवण्यात येते. आदिवासी गावांमध्ये वाचन संस्कृती वाढवणे तसेच माहिती, ज्ञान, मनोरंजन, जिज्ञासा पूर्तीसाठीची साधने पुस्तकांच्या माध्यमातून उपलब्ध करणे  हे उदिष्ट साध्य करण्यासाठी भोंगा वाचनालय, पुस्तक डिस्प्ले, विविध अभ्यास, महिला यांना देवघेव प्रक्रियेत टिकवून ठेवणे, पुस्तकसंग्रह, पुस्तकनिवड, पुस्तक मागणी, साहित्य निर्मिती असे उपक्रम राबवण्यात आले. देवघेव हा उपक्रम आठवड्यातून ३ दिवस वर्षभर चालविला गेला.

जनुना या गावातील पार्वती बेलसरे या महिला गृहिणी असून त्या नेहमी घरातच राहत होत्या व गावाशी वा जगाशी त्यांचा काहीही संपर्क नव्हता. मात्र पुस्तक देवघेव प्रक्रियेत त्या सामील झाल्या व पुस्तके वाचन करायला लागल्या. सुरूवातीला छोटी गोष्टींची पुस्तके त्या घेत होत्या. परंतु आता माहितीपर पुस्तके घेण्यावर  त्या भर देतात. वाचलेल्या पुस्तकाविषयी गावमित्रासोबत त्या बोलतात तसेच गावातील इतर महिलांसोबतसुद्धा जे वाचले त्यावर संवाद करतात. त्यांच्या मुलांना त्या पुस्तकातील गोष्टी वाचून दाखवतात.

| गाव | एकूण कुटुंब | जोडलेली वाचक संख्या |
|---|---|---|
| कोहा | १०८ | ३५९ |
| जनुना | १२४ | ४४१ |
| खिरकुंड खु. | ७५ | १६९ |
| खिरकुंड बु. | २९९ | ५६५ |





**स्थानिक चित्रकारांसाठी चित्रकला प्रशिक्षणाचे आयोजन**

उन्नती संस्थेने गाव वाचनालय या प्रकल्पाच्या माध्यमातून गावातील महिला, पुरुष इत्यादी कडून जवळपास १७ कोरकू गोष्टींचे लेखन करून घेतले आहे. भविष्यात या गोष्टींचे पुस्तक तयार करून प्रकाशित करण्याचा संस्थेचा मानस आहे. लिखाण केलेल्या गोष्टींमध्ये चित्रे स्थानिक चित्रकारांकडून काढून घ्यावीत असे संस्थेने ठरवले. रणजीत कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली चित्रकला प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेचा केंद्रबिंदू "कथांवर आधारित चित्रे कशी काढावीत" हा होता. गावस्तरावरील एकूण ९ सहभागींनी एकूण ९ गोष्टींवरील चित्र या कार्यशाळेत रेखाटली आहेत. उर्वरित ८ गोष्टींवरील चित्रे पुढील काळात पूर्ण करून घेतली जाणार आहेत.



# गाव वाचनालय




**खरेदी केलेल्या पुस्तकांचा डिस्प्ले**

कार्यालयाने २०२४-२५ या कालावधीत एकूण ११९८ पुस्तके खरेदी केली, तसेच ८९ पुस्तके भेट मिळाली. या पुस्तकांची नोंद संस्थेच्या कार्यालय लायब्ररी व्यवस्थापनात करण्यात आली तसेच प्रत्येक पुस्तकाचे व्यवस्थित लेबलिंग करून ती अंतिमतः वापरासाठी तयार करण्यात आली.

कार्यालयमध्ये आलेल्या नवीन पुस्तकांची माहिती सर्व कार्यकर्त्यांना असावी या हेतूने नेहमी आलेल्या नवीन पुस्तकांचा डिस्प्ले कार्यालयात आकर्षक पद्धतीने लावण्यात आला ज्यामध्ये सर्व संघाने सहभाग घेतला. या उपक्रमाद्वारे संस्थेतील प्रत्येक सदस्याला पुस्तकांची ओळख करून देण्यात आली. वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी हा डिस्प्ले सर्व कार्यकर्त्यांना नव्या माहितीच्या जगात घेऊन जाणारा ठरला.

**भोंगा वाचनालय उपक्रम**






खीरकुंड खु. मधील ४ निरक्षर वरिष्ठ नागरिक भोंगा वाचनालयामध्ये नियमित येतात व भोंग्यावरील गोष्टी ऐकतात तसेच याच गावातील दारशिम्बे या कुटुंबातील पती पत्नी व दोन मुले असे सर्वच जण नियमित पुस्तक वाचनासाठी पुस्तक प्रदर्शनीजवळ येतात व पुस्तके वाचन करतात.

खीरकुंड बु. येथील रामलाल बेलसरे हे गाव वाचनालयामध्ये नियमित वाचक आहेत. ते नियमित वाचन करीत असल्यामुळे त्यांच्या घरातील इतर सदस्यांना सुद्धा वाचनाची प्रेरणा मिळाली व घरातील सर्व लोक नियमित वाचक झाले आहेत.

**आधी मला मुलांसोबत काय उपक्रम घ्यावेत हे समजत नव्हते मात्र आता पुस्तक वाचनामुळे मुलांना विविध गोष्टी सांगणे व गाणे घेणे इत्यादी उपक्रम घ्यायला जमले आहे.**
**-आशा ढीगर, मुलांसोबत वर्ग घेणारी एक कार्यकर्ती**

# किशोरींचे नेतृत्व विकसन (LC)



जनुना या आदिवासी गावात उन्नती संस्था युवतींच्या नेतृत्व विकसनासाठी प्रयत्नशील आहे. गावातील १२ मुलींच्या गटाला मुंबईतील वाचा संस्थेच्या पुढाकाराने पद्धतशीरपणे प्रशिक्षण देण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणजे या मुलींनी गावातील त्यांना जाणवणारी एक समस्या निवडून त्यावर काम करायचे असते. यात सर्वेक्षण, गावातील लोकांसोबत बैठका अशा प्रयत्नांचा समावेश असतो. इकडच्या सर्व ग्रामीण भागांत लोक बरीच लोकं शौचालयाचा वापर न करता रस्त्यावरच आपला कार्यभाग उरकतात. या मुलींनी ही समस्या पुढे काम करण्यासाठी निवडली.




अन्य गावांकडून शिकण्याच्या उद्देशाने या मुलींचा अकोट तालुक्यतील लोहारी गावात मुलींचा अभ्यासदौरा गेला होता. यावेळी अकोट पंचायत समितीचे शौचालय विभागाचे प्रमुख यांनी मुलींना लोहारी खुर्द गावाची माहिती दिली आणि शौचालयांचे विविध प्रकार, तसेच शासकीय योजनांबद्दल सखोल माहिती दिली. नंतर, गाव फेरी घेऊन शौचालयांचे प्रकार प्रत्यक्ष दाखवून मुलींना त्याची माहिती दिली.

गावातील सरपंच आणि नागरिकांनी सरकारी योजनांचा योग्य उपयोग करून कसा आदर्श गाव निर्माण केला, गावातील कचरा व्यवस्थापन, ओला व सुका कचरा, प्लास्टिकची विल्हेवाट, सांडपाणी व्यवस्थापन आणि ग्रामपंचायतीतून सुरु केलेले गाव वाचनालय, अंगणवाडी त्याची माहिती दिली.
या अभ्यास दौऱ्याने मुलींना त्यांच्या गावात शौचालय आणि स्वच्छतेशी संबंधित जनजागृती कशी करावी याबाबत सशक्त विचार आणि प्रेरणा दिली. तसेच, गावाच्या सुधारण्याच्या प्रक्रियेत लोकसहभाग महत्त्वाचा असतो हे देखील त्यांनी अनुभवले.

## युवतींनी काढली "शौचालय जनजागृती" फेरी

अभ्यासदौऱ्याहून आल्यावर या मुलींनी आपल्या जनुना गावात प्रेरणादायी फेरीचे आयोजन केले. या फेरीत गावातील विविध वयोगटांतील एकूण ७८ जणांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.
गाव फेरीचा समारोप शाळेतील मुलांसोबत करण्यात आला. यावेळी प्रत्येक कुटुंबात शौचालय असणे हे स्वच्छता आणि आरोग्यासाठी किती महत्त्वाचे आहे, याची जाणीव सर्वांना करून देण्यात आली.
फेरीत रंगीबेरंगी चित्रे व पोस्टर्स हातात घेऊन, शौचालयाचे महत्त्व सांगणारे प्रभावी नारे दिले गेले. गावातील कुटुंबांनी घराबाहेर येऊन या जनजागृती फेरीतील संदेश ऐकला.



# किशोरींचे नेतृत्व विकसन (LC)



**जागतिक महिला दिनानिमित्त गावात समाजप्रबोधनपर कीर्तनाचे आयोजन**

उन्नती संस्था गावातील सामाजिक विषयांवर जनजागृती करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असते. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ८ मार्च २०२५ रोजी जनुना गावात प्रसिद्ध समाज प्रबोधनकार डॉ. रामपाल महाराज (सप्त खंजिरी वादक) यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते. त्यांनी कीर्तनाच्या माध्यमातून सामाजिक जागरूकता निर्माण करत विविध महत्त्वाच्या विषयांवर प्रबोधन केले.

- **मुलांच्या शिक्षणात मातृभाषेचे महत्त्व** – महाराजांनी स्पष्ट केले की, मुलांचे शिक्षण प्रभावी होण्यासाठी मातृभाषा सर्वात महत्त्वाची असते. मातृभाषा मुलांना आत्मविश्वासाने व्यक्त होण्यास मदत करते.
- **महिला सक्षमीकरणाची गरज** – आज प्रत्येक क्षेत्रात महिला पुढे येत आहेत, त्यामुळे मुलींना शिक्षण मिळणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षण घेतलेल्या मुली गावाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. त्यामुळे गावकऱ्यांनी त्यांना संधी द्यावी आणि त्यांच्या हातांना बळकट करावे, असे आवाहन त्यांनी केले.
- **शौचालय आणि स्वच्छतेचे महत्त्व** – शासनाने शौचालय योजना दिली असली तरी अनेक लोक अजूनही त्याचा वापर करत नाहीत. बाहेर शौचास जाणे आरोग्यासाठी धोकादायक असून, गावातील मुलींनी स्वच्छतेच्या कामाला प्राधान्य दिले आहे. त्यांना सहकार्य करा, कारण त्या निश्चितच गावात सकारात्मक बदल घडवून आणतील, असा विश्वास महाराजांनी जनुना गावातील नागरिकांना दिला.

या कार्यक्रमाला गावातील साधारणपणे सुमारे १०० महिला व ४० पुरुष नागरिकांनी उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यामध्ये जवळपासच्या कुंड, बोरी,कोहा या गावातून साधारण १५ लोक उपस्थित होते.

गावात अश्याप्रकारचा कार्यक्रम झाल्यामुळे पालक LC (समुदाय शिक्षण) गटातील मुलींना सत्र किंवा प्रशिक्षणासाठी पाठवायला सकारात्मक झाले, गावातील लोकांचा देखील गटातील मुलींकडे पहाण्याचा दृष्टीकोन सक्रिय पद्धतीचा दिसून आला.

एकंदरीत लोकांच्या प्रतिक्रिया चांगल्या होत्या, लोकांच्या मते यासारखे प्रबोधनात्मक कार्यक्रम गावात व्हायला हवेत, अशा कार्यक्रमातून लोकांना प्रत्यक्ष विषयांची माहिती होते. तसेच गावात सुद्धा असा आगळा वेगळा कार्यक्रम घेतल्यामुळे गावातील महिलांना या कार्यक्रमात सहभाग घेता आला.



# शाळा वाचनालय






या कार्यक्रमान्तार्गत शहापूर तालुक्यातील आश्रम शाळांमध्ये आदिवासी मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि त्यांना वाचनातून मिळणाऱ्या आनंदाच्या संधी उपलब्ध करून देणे, तसेच पुस्तकांच्या माध्यमातून विविध जागतिक पैलुंशी, जीवनाशी, दृष्टीकोनाशी परिचय करून देऊन त्यांच्या कक्षा विस्तारणे हे उद्दीष्ट्य समोर ठेवून काम केले जाते.
आठवड्यातील ४ दिवस आश्रम शाळांमध्ये ही सत्रे घेण्यात येतात.

आफिर उपक्रमामध्ये वाचनालय वर्गासाठी मुलांना पुस्तकांमध्ये आवड निर्माण करण्यासाठी तसेच साक्षरतेसाठी उन्नती वाचन उपक्रमामधील ४२ कृतींमधील इयत्ता पाचवी वर्गासाठी गोष्ट सांगणे, गोष्ट वाचून दाखवणे, मी आहे जुळणारी, शब्द साखळी, वाक्य तयार करणे आणि शब्द संग्रह आदी  कृती निवडण्यात आल्या होत्या. तर सहावी वर्गासाठी मी आहे जुळणारी, शब्द साखळी, गोष्ट सांगणे, गोष्ट वाचून दाखवणे, पुस्तक झलक, नकाशा वाचन, वाक्य तयार करणे, शब्दसंग्रह  या कृती निवडण्यात आल्या होत्या.

**मागील शैक्षणिक वर्षांत चार शाळांतील १६९ मुलांनी  ५८८८ पुस्तके वाचली.  यामध्ये अधिकाधिक कथा कादंबरी प्रकारातील पुस्तके होती. त्या खालोखाल माहितीपर, कविता असे प्रकार येतात.**

**साक्षरता चाचणी :**
वाचनालयातील साक्षरता हा देखील उन्नतीच्या कामाचा भाग असल्याने जुलै महिन्यात चारही आश्रमशाळांतील मुलांच्या साक्षरता क्षमता चाचणी घेण्यात आल्या. मुलांच्या वाचन क्षमता तपासणे हे यामागील प्रमुख उद्दिष्ट होतं. यासाठी चारही आश्रमशाळांतील मिळून पाचवी- इयत्तेतील ७७ मुली आणि ३२ मुलगे तर सहावी इयत्तेतील ८८ मुली व ५५ मुले सहभागी करून घेण्यात आली होती.
या चाचणीनुसार विद्यार्थ्यांच्या क्षमता खालीलप्रमाणे :




यानुसार सर्वाधिक मुलांची संख्या ही आकलनासहीत वाचता येणाऱ्या (वाचनगट पूर्ण), वाचन गट आणि जोडाक्षर गटातील विद्यार्थ्यांची होती. त्यामुळे चौदाखडी आणि मुळाक्षर गटाबरोबर विविध प्रकारचे उन्नती वाचनालय उपक्रमाच्या माध्यमातून वाचन पूर्ण गटापर्यंत आणण्याचे प्रमुख काम केले गेले तर, वाचन आणि वाचनपूर्ण गटाद्वारे आदिवासी भाषांमधील संवाद, वाक्य विकसित होणे यावर जास्त भर देण्यात आला.

# शाळा वाचनालय



**शाळेतील आदिवासी मुलांनी केले सर्वेक्षण**

मुलांमध्ये नेतृत्व गुणांचा विकास व्हावा यासाठी शहापूर येथील बाबरे आश्रम शाळा (कातकरी) तर शेणवे येथील कन्या आश्रम शाळेतील मुली आणि मुले यांच्याबरोबर युथ गट चालवण्यात येतो. त्यांना आपापल्या गावांत दिवाळीच्या व उन्हाळ्याच्या सुट्टीत गाव वाचनालय चालवण्याचे काम देण्यात आले होते. त्यासाठी आवश्यक कौशल्ये व दृष्टिकोनाचा विकास होण्यासाठी त्यांच्यासोबत विविध उपक्रम घेण्यात आले होते.

याचाच एक भाग म्हणून या मुलांना गणपतीच्या सुट्टीदरम्यान त्यांच्या गावात वाचनालय पूर्वतयारी सर्वेक्षण करण्यास देण्यात आले होते. यामध्ये दोन्ही शाळेतील २५ मुली आणि ५ मुले यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये २२ गावातील १४१ कुटुंबापर्यंत या मुली पोहचल्या आणि सुमारे १०६८ लोकांचे सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणाचे विश्लेषण शाळेतील यूथ गटातील विद्यार्थ्यांनी केले. यासाठी डोंबिवली येथील कर्नाटका संघाच्या मंजुनाथ महाविद्यालयाच्या एनएसएस प्रतिनिधींनी त्यांना मदत केली.

सर्वेक्षणातून समोर आलेले निकष असे आहेत:

- **गावांमध्ये किशोरवयीन मुली-मुलांचे प्रमाण कमी आढळून येते. (कदाचित शिक्षणासाठी बाहेर वसतिगृहांत जात असावीत)**
- **गावात १०वी आणि १२ वी इयत्तेनंतर शिक्षणात मोठ्या प्रमाणात घट दिसून येते तर १५ वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या मुली-मुलांची संख्या अवघी १० टक्के आहे.**
- **गावातील एकूण महिलांपैकी सुमारे ३४ टक्के महिला या स्वतःच्याच शेतात कामे करतात तर ८ टक्के महिला या अन्य लोकांच्या शेतात जाऊन शेतमजूरी करतात.**
- **गावात वाचनालय असावे का याबाबत सगळ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. गावांमध्ये अशा प्रकारची कुठलीही पुस्तके वाचण्यास उपलब्ध नसतात.**
- **गावातील सर्वेक्षण केलेल्या एकूण १०६८ नागरिकांपैकी १०५ महिला आणि १५३ पुरुष यांनी वाचता येते असे सांगितले.**
- **सर्वाधिक म्हणजे ८८ घरांनी संध्याकाळी पुस्तके वाचायला आवडतील असे सांगितले. दिवसभर शेतातील कामांमुळे स्त्रिया आणि पुरुष बाहेर असतात. त्यामुळे त्यांनी संध्याकाळला अधिक पसंती दिली.**

**यूथगटाने चालवले गाव वाचनालय**



शेणवे आणि बाबरे शाळेत निवासी असणाऱ्या १८ विद्यार्थिनी आणि विद्यार्थ्यांनी आपापल्या १० गावांमध्ये गाव वाचनालय चालवले. या वाचनालयाच्या माध्यमातून हे विद्यार्थी अनुक्रमे १२६ महिला आणि ८१ महिला यांच्यापर्यंत पोहचले.

मुलांनी गावांमध्ये आपले घर असलेल्या वाडीत किंवा गल्लीत गाव वाचनालय चालवले. यामध्ये त्यांनी पुस्तकांचे चटईवरील डिस्प्ले लावून लोकांपर्यंत पुस्तके पोहचवण्याचा प्रयत्न केला. यामध्ये मुलांची संवाद, सर्जनशीलता आदी गोष्टीतील कौशल्ये विकसित होण्यावर भर दिला होता.

> **मुलांना स्वतंत्र वाचनाचा तास आवडतो. विशेषतः मुलग्यांना टेबल्सखाली, कोपऱ्यात बसून पुस्तके वाचण्यात मजा येते. असते. तिथे त्यांना कोणी डिस्टर्ब करत नाही अशी भावना त्यांच्यात दिसते. त्यामुळे मुलांना स्वातंत्र्य देणे आवश्यक आहे. - सुलभक**

# संस्थात्मक उपक्रम

**लैंगिक छळ प्रतिबंध (POSH) समितीची स्थापना**




३० जानेवारी २०२५ रोजी उन्नती संस्थेत लैंगिक छळ प्रतिबंधक समिती (POSH कमिटी) स्थापन करण्यात आली. या समितीच्या माध्यमातून संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित आणि सकारात्मक कार्यस्थळ निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.
समितीमध्ये संस्थेच्या अकोला जिल्ह्यातील रुईखेड या कार्यालयातून सुभाष केदार आणि गायत्री लोणकर, तर ठाणे जिल्ह्यातील शहापूर कार्यालयातून गौरी गोखले आणि भारती जाधव यांची समिती सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. समितीच्या अध्यक्ष म्हणून गौरी गोखले यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
तसेच या समितीचे बाह्य समुपदेशक म्हणून प्रा. जयश्री कर्वे यांची नेमणूक करण्यात आली आहे. या समितीच्या आत्तापर्यंत दोन सभा पार पडल्या आहेत.

**कार्यकर्त्यांची रक्ततपासणी**



आदिवासी समाजातील महिलांमध्ये रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी असण्याचे प्रमाण अधिक असून, त्यामुळे त्यांना ॲनिमिया, सिकलसेल यांसारख्या आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागते.
याच अनुषंगाने, संस्थेच्या कार्यालयातील कार्यकर्त्यांमध्ये तरी जागृती निर्माण व्हावी व त्यांचे हिमोग्लोबिनचे प्रमाण समजावे, यासाठी दिनांक २५ मार्च २०२५ रोजी रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.
तपासणीच्या निष्कर्षानुसार, ४ महिला कार्यकर्त्यांचे हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी असल्याचे आढळून आले. संस्थेच्या वतीने त्यांना योग्य आहार आणि जीवनशैलीसंदर्भात मार्गदर्शन करण्यात येणार आहे, जेणेकरून त्यांचे आरोग्य सुधारण्यास मदत होईल. तसेच, ५ कार्यकर्त्यांना त्यांचा रक्तगट माहित नव्हता, आणि या तपासणीमुळे त्यांना त्यांची रक्तगटाची माहिती मिळाली.

**कार्यकर्त्यांची आर्थिक सक्षमतेकडे वाटचाल**

उन्नती संस्थेमध्ये बहुतांश कार्यकर्ते आदिवासी समाजातील असून, त्यांच्यामध्ये आर्थिक नियोजनाची जाणीव निर्माण करणे हे एक मोठे आव्हान होते. संस्थेने कार्यकर्त्यांसाठी म्युचुअल फंड आणि सार्वजनिक निर्वाह निधी (PPF) या गुंतवणुकीच्या साधनांबद्दल एक विशेष मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते.
मात्र या प्रवासात अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागले. आधार कार्ड बँक खात्याशी जोडणे, मोबाईल क्रमांक आधारशी लिंक करणे, आधार अपडेट करणे, पॅन कार्ड व आधार कार्डवरील नावातील विसंगती दूर करणे अशा अनेक तांत्रिक अडचणींवर मात करावी लागली.
या सर्व प्रयत्नांचे फलित म्हणून आज:

- ८ कार्यकर्त्यांचे म्युचुअल फंड खाते सक्रिय झाले आहेत
- १५ कार्यकर्त्यांनी PPF खाते सुरू केले आहे
- आणखी ३ कार्यकर्त्यांचे म्युचुअल फंड खाते प्रक्रियेत आहे

आयुष्मान भारत योजना : या योजने अंतर्गत संस्थेच्या ६ कार्यकर्त्यांनी आयुष्मान भारत योजनेमध्ये नोंदणी केली असून त्यांना आभा कार्ड प्राप्त झाले आहेत. इतर कार्यकर्त्यांची नोंदणी प्रक्रिया सुरु आहे.

# नेटवर्किंग

## आदिवासी शिक्षण पद्धतीवर संवाद: संस्कृती व शिक्षणाचा संगम



भोपाळ येथे तीन दिवस मुस्कान या संस्थेमार्फत "इंडीजेनस आदिवासी शिक्षा पर संवाद" या विषयावर विशेष संवाद चर्चेचे आयोजन करण्यात आले होते.
यात उन्नती संस्थेतील २ कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. या संवादाचा मुख्य उद्देश आदिवासी शिक्षण पद्धती, समुदायाची जीवनशैली, व संस्कृती यांचा परस्पर संबंध उलगडणे, यांचे सध्याच्या शिक्षण व्यवस्थेत काय स्थान आहे याचा धांडोळा घेणे हा होता. विविध राज्यांमधील आदिवासी समुदायांसोबत कार्य करणाऱ्या चळवळी, संस्था व व्यक्ती या कार्यशाळेत सहभागी होत्या.
त्यांनी आपापल्या क्षेत्रातील अनुभव, शिक्षणासाठी केलेले प्रयत्न, तसेच आदिवासी संस्कृती टिकवण्यासाठी घेतलेली पावले यावर चर्चा केली. प्रदर्शनामध्ये विविध संस्थांनी मुलांच्या मातृभाषेत शिक्षणासाठी तयार केलेले शैक्षणिक साहित्य, आदिवासी समुदायाच्या जीवनशैलीचे दर्शन घडविणाऱ्या वस्तू, तसेच स्थानिक संस्कृतीशी संबंधित उपक्रम मांडले. संवाद चर्चेमध्ये सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांनी आदिवासी शिक्षण पद्धतीला चालना देण्यासाठी मातृभाषेतील शिक्षणाच्या गरजेवर भर दिला.

## संस्था बांधणी व संचालन

संस्था चालवण्यासाठी विविध कौशल्ये आणि ज्ञान आवश्यक असते. आम्ही विविध ठिकाणांवरून हे मिळवण्याचा सातत्याने प्रयत्न करीत असतो. मुंबईमधील आत्मा ही संस्था अशा पद्धतीची प्रशिक्षणे देते. उन्नती संस्थेची त्यांच्या एका कार्यक्रमात निवड झाली असून हा उपक्रम वर्षभर चालत आहे.

## विप्रोचे पार्टनर्स फोरम

विप्रोने भागीदार संस्थांचे संमेलन बंगलोर येथे अझिम प्रेमजी युनिव्हर्सिटी येथे ४ ते ६ डिसेंबर दरम्यान आयोजित केले होते. व्यासपीठावरील सत्रे, गटचर्चा, मुलाखती, संस्थांच्या कार्याची प्रदर्शनी असे स्वरूप होते.
शिकण्यासाठी समृद्ध असे विषय व सत्र रचना, पर्यावरणपूरक रचना, व्यासपीठावर व गटचर्चा घेण्यात महिलांची लक्षणीय संख्या, सर्वांना बोलायची समान संधी, उच्च-नीचतेच्या पलीकडे जाऊन सर्व जण समपातळीवर अशी या फोरमची वैशिष्ट्ये होती, जी प्रेरणा देऊन गेली.





# नेटवर्किंग

**बाह्य संस्थांची उन्नतीला भेट**

उन्नती संस्थेच्या मातृभाषा-आधारित बहुभाषिक शिक्षण पद्धतीची माहिती घेण्यासाठी दोन संस्थांनी आमच्या कार्यक्षेत्राला भेट दिली.

मुलांना बहुभाषिकता तत्त्वांवर आधारित गुणवत्तापूर्ण शिक्षण कसे देता येईल, यासाठी कोणती पद्धत वापरावी, अंमलबजावणी कशी करावी याविषयी समजून घेण्यासाठी अमरावती जिल्ह्यातील सदया फाउंडेशन व खोज या संस्थांच्या कार्यकर्त्यांनी संस्थेस भेटी दिल्या.

'सदया फाउंडेशन' चे दोन कार्यकर्ते अमरावती जिल्ह्यातील धारणी येथून आले होते. तसेच चिखलदरा तालुक्यातील खोज संस्थेचे १३ सदस्य उन्नतीच्या कामाची माहिती घेण्यासाठी आले. त्यांनी शाळा वाचनालय आणि शिकू आनंदे (मातृभाषा आधारित बहुभाषिक साक्षरता शिक्षण) या कार्यक्रमा मधील वर्गांचे निरीक्षण केले. तसेच गाव वाचनालयातील देवघेव प्रक्रियेचा अनुभव घेतला. त्यांनी संस्थेच्या शैक्षणिक साहित्याची ओळख करून घेतली. त्यांना हे साहित्य उपयुक्त वाटल्याने त्यांनी या साहित्याची मागणी केली.

**नर्मदा जीवन शाळेचा बालमेळावा**



दिनांक १४ ते १६ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत नर्मदा जीवन शाळेच्या वतीने रेवानगर, ता. तरोडा, जि. नंदुरबार येथे भव्य बालमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

उन्नती संस्थेमार्फत १६ जणांनी सहभाग घेतला. या मेळाव्यात नर्मदा नवनिर्माण अभियानाच्या तालुक्यातील सात गावांतील मुले व शिक्षक सहभागी झाले होते. बालमेळाव्याच्या माध्यमातून त्यांच्यातील विविध क्रिडा, कला गुण तसेच निंबध, वक्तृत्व, चित्रकला, आरोग्य तपासणी, विविध स्थानिक सांस्कृतिक कार्यक्रम असे उपक्रम घेतले गेले. आदिवासी मुलांबरोबरचे नाते कसे जोडले जाते, त्यांच्यातील नैसर्गिक कला-गुणांना कसा वाव दिला जातो, त्यांच्या भाषांचा, संस्कृतीचा यामध्ये कसा सहभाग करून घेतला जातो, हे देखील या निमित्ताने पाहता आले.

मेधाताई पाटकरांचा सहवास, अत्यंत शिस्तबद्ध आयोजन, विविध स्पर्धा व कार्यक्रम यांमुळे उन्नतीचे कार्यकर्ते भारावून गेले होते.

या मेळाव्यामध्ये उन्नती संस्थेने तयार केलेल्या शैक्षणिक साहित्याची प्रदर्शनी लावण्यात आली होती.

# संघ सक्षमीकरण

उन्नती संस्था मागील ११ वर्षापासून आदिवासी भागात काम करत आहे. वर्ष २०२४-२५ मध्ये संस्थेने कार्यकर्त्यांच्या सक्षमीकरणासाठी विविध प्रशिक्षण आणि वाचन अभ्यासगटांचे आयोजन केले. संस्थेच्या कार्याच्या केंद्रस्थानी कार्यकर्त्यांचे सक्षमीकरण हा मूलभूत उद्देश राहिला. संस्थेच्या विविध उपक्रमांमध्ये कार्यरत असलेल्या कार्यकर्त्यांची शैक्षणिक, सामाजिक आणि वैयक्तिक पातळीवरील क्षमता वाढावी यासाठी या वर्षात विविध अंतर्गत व बाह्य प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये शिक्षण विषयक मूलभूत ज्ञान, वाचन संस्कृती, कला-शिक्षण, मानसिक आरोग्य, समाजशास्त्र, आणि लिंग समविचार यांसारख्या क्षेत्रांतील प्रशिक्षणांचा समावेश होता.

या वर्षात उन्नती कार्यकर्त्यांनी <u>एकूण ४७ विषयांवर</u> विविध प्रशिक्षणे/ कार्यशाळा/ वेबिनार यांमध्ये सहभाग घेतला. यातील काही महत्वाची प्रशिक्षणे पुढीलप्रमाणे:

**<u>शिक्षण हक्क कायद्याचे प्रशिक्षण:</u>**

पुणे येथील शिक्षण हक्क चळवळीतील प्रमुख कार्यकर्ते व अभ्यासक मंदार शिंदे यांनी हे प्रशिक्षण घेतले. कायदा म्हणजे काय? कायदा कोण बनवते, योजना, कायदा,अभियान यातील फरक कोणते आदीबाबत विस्तृत माहिती त्यांच्याद्वारे देण्यात आली.

बालकांचे विविध कायदे कोणते आणि त्यामध्ये बालकांचे निश्चित केलेले वय, त्यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी इत्यादी मांडणी करण्यात आली.

शिक्षण हक्क कायदा लागू करण्याचे प्रयोजन व त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या दुरुस्त्या याविषयी सहभागींना माहिती देण्यात आली. त्यानंतर विविध कार्यकर्ते मांडत असलेल्या प्रश्नाचे निराकरण हे शिक्षण हक्क कायद्यामध्येच कसे आहे याचे विविध कलमे वाचून समजवण्यात आले. त्यामुळे कायदादेखील मनोरंजक वाटू लागला. एकूणच हे सत्र अत्यंत रोचक आणि व्यावहारिक मुद्द्यांना धरून घेण्यात आले.

**<u>मानसिक आरोग्य या विषयातील बैठक</u>**

मुलांचे मानसिक आरोग्य समजावून घेऊन त्यावर सहभागी पद्धतीने अभ्यासक्रम तयार करण्यात येणार आहे. यासाठी ‘सेंटर फॉर मेंटल हेल्थ लॉ आणि पॉलिसी’ या संस्थेच्या वतीने नीरजा अवटी यांची एक बैठक टीमबरोबर आयोजित करण्यात आली होती. यामध्ये नीरजा यांनी संस्थेचे रचना आणि संस्थेचे काम समजावून घेतले. मुलांबाबतचा अप्रोच, संघाचा मुलांशी असलेला कनेक्ट इत्यादी बाबतही प्रश्न विचारले.

**<u>गोष्ट लेखन कार्यशाळा</u>**

गोष्ट लिहिताना वाचकाला कोणते प्रश्न पडतील वाचताना या दृष्टीने विचार करून गोष्ट लेखन करावी. गोष्ट लिहिण्याचे ३ टप्पे समजले प्रारंभ, मध्य व शेवट या तिन्ही टप्प्यांमध्ये साधारणता किती शब्दांचा मजकूर असावा ? वाचक वर्ग चा विचार करून गोष्ट लिहिल्या जाते, त्यानुसार गोष्ट कशी बदलावी. गोष्टीची पुस्तक तयार करताना लेखकाची व चित्रकाराची भूमिका समजली.

**<u>पेडागोजी ऑफ फौंडेशनल लर्निंग – हिंदी</u>**

या कार्यशाळेत मुलांना साक्षर करताना कोणकोणत्या पायरीने समोर जाऊ शकतो हे शिकायला मिळाले. तसेच साक्षरतेच्या प्रक्रियेत एकुणात असणारे टप्पे जसे मौखिक कृती, शैक्षणिक साहित्याचे वापर, भाषिक खेळ, वापरल्याने वर्ग कसा मजेशीर शिकू शकतो हे समजले. मुलांना लेखनाचे नियम शिकविण्याकरिता नियंत्रित लेखन समजले.

# संघ सक्षमीकरण

**वाचनालय प्रशिक्षण**

वाचनालय चालविताना पुस्तकांची निवड कशी करावी, वाचक कोण व किती आहेत या दृष्टीने पुस्तक संख्या,पुस्तक निवड व पुस्तकांची मांडणी करावी हे समजले. उन्नती वाचनालय उपक्रम मधील शब्द्साखळी, नकाशा तयार करणे,गोष्ट सांगणे, गोष्ट वाचून दाखविणे अश्या कृती कश्या घ्याव्या हे शिकायला मिळाले. गोष्ट सांगण्याआधी व नंतरची कृती समजली.



**वर्गातील विशेष गरजा असलेल्या मुलांना सोबत कसे काम करावे - कार्यशाळा**

या द्वारे अभ्यासातील भिन्नता, अभ्यासातील अडचणी आणि अध्ययन अक्षमता इत्यादी संकल्पना स्पष्ट झाल्या. अशा अडचणी ह्या मुलांच्या जीवनातील होणाऱ्या विशिष्ट अडथळ्याने निर्माण होतात, जसे कि पोषणाची कमतरता, भावनिक अस्वस्थता, शैक्षणिक संसाधनाचा अभाव, अनियमित शिक्षण, पालकांचे दुर्लक्ष, प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता आदी.

**वाचन अभ्यासगट उपक्रम**

संस्थेच्या संचालिका हेमांगी जोशी यांनी संस्थेच्या कार्यकर्त्यांना वाचनाची गोडी लागावी, त्यांना नियमितपणे वाचनाची सवय लागावी यासाठी ‘वाचन अभ्यासगट’ हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला. अभ्यासगटाचे स्वरूप, नियम, आणि पुस्तक निवडीबाबत त्यांनी कार्यकर्त्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. त्यामधून प्रत्येक शनिवारी सकाळी एक तासाचे ‘वाचन सत्र’ ठरवण्यात आले.

अकोला येथे २ गट व शहापूर येथे १ वाचनगट चालतो. निवडलेल्या पुस्तकांचे वाचन करताना अर्थ न समजलेल्या शब्दांची नोंद केली जाते आणि त्यानंतर त्यांचे अर्थ शोधून समजावून घेतले जातात. त्यांची भाषिक कौशल्येही सुधारण्यासाठी मदत होते. हे वाचन सत्र केवळ ज्ञान मिळविण्यापुरते मर्यादित न राहता ते कार्यकर्त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक विकासाचे एक सशक्त साधन ठरले आहे. आतापर्यंत अभ्यासगटांची ९ सत्रे पार पडली आहेत.

# संस्था व्यवस्थापन

कार्य व संस्था व्यवस्थापनासाठी वर्षभरात आयोजित झालेल्या विविध सभा:

स्टाफ सभा (२ कार्यालयांत) - सरासरी १२

समन्वय सभा - ३८

व्यवस्थापन सभा - २०

संघाच्या साप्ताहिक सभा (४ प्रकल्पनिहाय) - सरासरी ३०

प्रकल्प आढावा सभा (४ प्रकल्पनिहाय) - सरासरी ७

संचालक मंडळ सभा - ४

वार्षिक सर्वसाधारण सभा - १

# शिक्षण प्रणालीसोबत सहयोग

## मराठी-कोरकू भाषेतील सूचना - शिक्षकांसाठी

दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ रोजी **आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन** संस्थेच्या प्रकल्पक्षेत्रातील शाळांमध्ये विशेष उपक्रम घेऊन साजरा करण्यात आला. अकोला जिल्हा शिक्षकांची भाषा मराठी आणि विद्यार्थ्यांची भाषा कोरकू असल्याने शाळांमध्ये संवादाची अडचण दूर व्हावी तसेच शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या भाषेचा अधिकाधिक वापर करावा हा उद्देश समोर ठेऊन मातृभाषा दिनाच्या निमित्ताने, शिक्षकांना कोरकू आणि मराठी भाषेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यास मदत करणाऱ्या सूचनांचे पोस्टर तयार करून ९ गावांतील जिल्हा परिषद शाळांमधील प्रत्येक वर्गात लावण्यात आले. या उपक्रमाचे शिक्षकांनी मन:पूर्वक स्वागत केले.



**शिक्षकांसाठी मराठी - कोरकू भाषेतील सूचना**

उन्नती संस्था

| मराठी | कोरकू |
|---|---|
| सरांना बोलावून आण. | गुरुजीके हाकोय. |
| मला पेन दे. | इनके पेन जे. |
| जेवणाअगोदर हात धु. | ज्योज्योमा पेयला टी आबोय. |
| माझ्या मागे म्हणा. | इंया टवूटे मांडे. |
| इकडे बघ. | इंगान डोगे. |
| नीट लक्ष दे. | अच्छाटे ध्यान जे. |
| तुला खिचडी कशी वाटली? | आमेन खिचळी च्युफिन घईयेन? |
| सर्वांनी गोलात बसा. | पारकू गोलेन सुबाय. |
| सर्वांनी डोळे बंद करा. | पारकू मेट बांडोय. |
| रोज अंघोळ करून या आणि स्वच्छ कपडे घालून या. | रोजोका आंगुजटे हाजे डो अच्छा आंगी उरीटे हाजे. |
| वर्गात कचरा करू नका. | वर्गान कचरा डाडा बाकी. |
| शांत बसा. | काटामटे सुबाय. |
| आज आपण नवीन गोष्ट शिकणार. | टईन आबू ओने मांडी इठूबा. |
| तू फळ्याजवळ ये आणि अक्षराला गोल कर. | आम फळामेरान हाजे डो अक्षर के गोले. |
| उद्या या, आपण भेटू. | पाटा हाजे, आबू मिलाटीवबा. |
| रोज शाळेत यायचं. | रोजोका इस्कुलेन हाजे. |
| गोलात धावा. | गोलेन साळूबे. |
| शद्ध वहीत लिही. | शब्द वहीन ओले. |
| मी वाचतो. तुम्ही माझ्या मागे म्हणा. | इन पळाटीयेबा. आपे इंया टवून मांडे. |

२१ फेब्रुवारी २०२५

उन्नती संस्था - द्वारा मंगेश गव्हाळे, मोतीराम महाराज आश्रम, राऊतवाडी रूईखेड ता. अकोट, जि. अकोला ईमेल - unnati.isec@gmail.com

**शिक्षकांसाठी मराठी - कोरकू भाषेतील सूचना**

उन्नती संस्था

| मराठी | कोरकू |
|---|---|
| सर्व मुलांनो, इकडे या. | सबई कातळ्याकु, इंगान हाजे. |
| मुलांनो, सर्व वर्ग स्वच्छ करा. | कातळ्याकु, सबई वर्ग आरीजे. |
| मुलांनो, कचरा उचलून बाहेर टाका. | कातळ्याकु कचरा टूले डो बल्लान टेळपाय. |
| सर्व कचरा कचरापेटीमध्ये टाक. | सबई कचरा कचरापेटी तालान आंडाय. |
| वर्गातील टेबल- बाकडा नीट सरकव. | वर्गागा टेबोल अच्छाटे ओसोरे. |
| वर्गातील फळा पुसून घे. | वर्गागा फळा ओजोय. |
| सर्वांनी शांत बसा. | सबई कू काटामटे सुबाय. |
| आज आपण सर्वजण हे गाणं म्हणूया. | टईन आबू सबईकु इनी शिरिंज मांडीबा. |
| तुम्हाला आज कोणते प्रश्न पडलेत का? | टईन आपेन टुनी प्रश्न बोच्योयेन कि च्योज? |
| काल तुला शाळेत यायला का बरं उशीर झाला? | कोलदिन आमेन इस्कुलेन हाज च्योयेन टेमो डायेन? |
| काल कुठे गेला होता? | कोलदिन टुंगान ओलेन डान? |
| वर्गात उशीरा का आला? | वर्गान टेमोटे च्योयेन हेन? |
| त्याला मारू नका. | डिजके मुंडा बाकी. |
| समोर सरक. | साम्मान ओसरे. |
| जेवण केले का? | आटा ज्योवेन? |
| खाली बस. | इटान सुबाय. |
| का रडत आहे? | च्योयेन ज्याम लाक्के? |
| अभ्यास करतो का? | अभ्यास डायबा? |
| उभा रहा. | टेंगोने. |

२१ फेब्रुवारी २०२५

उन्नती संस्था - द्वारा मंगेश गव्हाळे, मोतीराम महाराज आश्रम, राऊतवाडी रूईखेड ता. अकोट, जि. अकोला ईमेल - unnati.isec@gmail.com

# शिक्षण प्रणालीसोबत सहयोग

**अहवाल सादरीकरण**




**अकोला प्रकल्प**- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील उपक्रमांची संपूर्ण माहिती असलेला कामाचा अहवाल तयार करून अकोट तालुका शिक्षण विभागाला सादर करण्यात आला.
**शहापूर प्रकल्प-** अकोल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील उपक्रमांची संपूर्ण माहिती असलेला अहवाल तयार करून तो प्रकल्प अधिकारी यांना सादर करण्यात आला. अहवालामध्ये वर्षभर शाळेत राबवण्यात आलेला वाचनालय प्रकल्प, पुस्तकांची देवघेव त्यातील लाभार्थींची संख्या आणि प्रगती आदी माहिती देण्यात आली.

**मुख्याध्यापकांसोबत नियोजन सभा**

**अकोला प्रकल्प-** जुलै २०२४ मधे शिक्षण विभागाने रुईखेड केंद्रांतील शाळांसाठी आयोजित केलेल्या मुख्याध्यापकांच्या  सभेत संस्थेचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. आगामी वर्षात शिक्षक अभ्यासगटांचे स्वरूप ठरविण्यावर चर्चा झाली. यंदा अभ्यासगट शनिवारच्या शाळेच्या वेळेत आयोजित करावेत, अभ्यासगटाच्या दिवशी शिक्षक शाळेत न जाता अभ्यासगटांमध्ये सहभागी होतील असे ठरले. या सभेमुळे शिक्षक अभ्यासगटांचे नियोजन अधिक सुसूत्र आणि प्रभावी करण्यासाठी महत्त्वाची दिशा मिळाली.

**शहापूर प्रकल्प-** काम करत असलेल्या शाळांच्या मुख्याध्यापक/शिक्षकांच्या २ सभा; एप्रिल व जुलै २०२४ मधे शेणवे येथील कार्यालयात पार पडल्या. वर्षभरात झालेल्या कामाची व येत्या वर्षीच्या उपक्रमांचे स्वरूप यावर सविस्तर मांडणी झाली. शिक्षकांनीही उन्नती संस्थेच्या कामाची प्रशंसा केली तसेच, मुलांमध्ये झालेले सकारात्मक बदलांचाही स्वीकार केला.

जुलै ते ऑक्टोबर या दरम्यान ४ आश्रमशाळांमध्ये उन्नतीचे राबवण्यात आलेले उपक्रम, त्यातून झालेली उपलब्धी, मुलांचा विकास, त्यांनी वाचलेल्या पुस्तकांच्या संख्या या बाबत माहिती देण्यासाठी १८ डिसेंबर २०२४ मध्ये तीनही शाळांतील मुख्यध्यापकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शाळेत काम करताना येणाऱ्या अडचणी, मिळणारी मदत याबाबत देखील चर्चा करण्यात आली.



# संचालक मंडळ



हेमांगी जोशी



मोहन सुर्वे



शलाका देशमुख

# सदस्य



शेख जमीर

# सहयोगी आणि हितचिंतक

मयूर अंकोलेकर (Actuarist, Mumbai)
प्राजक्ता खरे (Associate Professor, Meiji Gakuin University, Yokohama, Japan)
श्रीकृष्ण काकडे (Professor at Shankarlal Khandelwal Akola of St. Gadgebaba Amravati University)

# उन्नती संघ

| | |
|---|---|
| हेमांगी जोशी | तिकाराम बेलसरे |
| संतोष लोणकर | किसना हेकडे |
| गौरी गोखले | शांता खोटे |
| सुभाष केदार | अनिता काकडे |
| रतनलाल जांबेकर | शीतल ढिगर |
| दादाराव केदार | दिव्या खाडे |
| रविंद्र कवाडे | मांगीलाल गवते |
| मृणाल पाटोळे | अदिती बासफोर |
| रूपाली पेठकर | शीतल तोडकर |
| गायत्री लोणकर | भारती जाधव |
| ज्ञानेश्वरी झापे | माधुरी भांगे |
| प्रमिला जामुणकर | भारती पडवळ |
| | अश्विनी कोंगेरे |

# INTERNS / VOLUNTEERS

सोनल पारधी - आदिवासी भाषांवर पीएचडी

काझुतोशी कामाडा आणि तात्सुकी मियामी -
जपान येथील तृतीय वर्षाला शिकत असलेले विद्यार्थी

# FINANCIAL HIGHLIGHTS

**UNNATI INSTITUTE FOR SOCIAL AND EDUCATIONAL CHANGE**
**(A Company Licensed under Section 8 of the Companies Act, 2013)**
**CIN: U74999MH2014NPL257528**
**Balance Sheet as at March 31, 2025**

Amount in Rupees

| Particulars | Note No | As at 31-Mar-25 | As at 31-Mar-24 |
|---|---|---|---|
| **I. EQUITY AND LIABILITIES** | | | |
| **(1) Shareholder's Funds** | | | |
| (a) Share Capital | | | - |
| (b) Reserves and Surplus | 2 | 35,33,463 | 27,40,272 |
| (c) Money received against share warrants | | | - |
| **(2) Share application money pending allotment** | | | - |
| **(3) Non-Current Liabilities** | | | |
| (a) Long-term borrowings | | | - |
| (b) Deferred tax liabilities (Net) | | | - |
| (c) Other Long term liabilities | | | - |
| (d) Long term provisions | | | - |
| **(4) Current Liabilities** | | | |
| (a) Short-term borrowings | 3 | - | - |
| (b) Trade payables | | | |
| (c) Other current liabilities | 4 | 25,32,716 | 13,09,622 |
| (d) Short-term provisions | | | |
| **Total** | | **60,66,178** | **40,49,894** |
| **II. Assets** | | | |
| **(1) Non-current assets** | | | |
| *(a) Fixed assets* | | | |
| (i) Tangible assets | 5 | 1,34,674 | 1,02,604 |
| (ii) Intangible assets | | | - |
| (iii) Capital work-in-progress | | | - |
| (iv) Intangible assets under development | | | - |
| (b) Non-current investments | | | - |
| (c) Deferred tax assets (net) | | | - |
| (d) Long term loans and advances | | - | - |
| (e) Other non-current assets | | | |
| **(2) Current assets** | | | |
| (a) Current investments | 6 | 37,13,085 | 30,91,992 |
| (b) Inventories | | | |
| (c) Trade receivables | | | |
| (d) Cash and cash equivalents | 7 | 20,82,218 | 7,66,435 |
| (e) Short-term loans and advances | | | |
| (f) Other current assets | 8 | 1,36,201 | 88,863 |
| **Total** | | **60,66,178** | **40,49,894** |
| Significant accounting policies | 1 | | |

**FOR, UNNATI INSTITUTE FOR SOCIAL AND EDUCATIONAL CHANGE**

**For Borgaonkar & Co.**
**Chartered Accountants**
**(Registration No. 145919W)**

BORGAONKAR & COMPANY CHARTERED ACCOUNTANTS FRN No. 145919W KALYAN

**Hemangi Joshi**
**Director**
**DIN No. 06607483**
**Place: Mumbai**

**Mohan Dadaji Surve**
**Director**
**DIN No. 07897064**
**Place: Mumbai**

**Rohan R. Borgaonkar**
**Partner**
**(Membership No. 179816)**

**Date: 22-09-2025**
**Place: Kalyan**
**UDIN - 25179816BMOEXQ8468**

# FINANCIAL HIGHLIGHTS

**UNNATI INSTITUTE FOR SOCIAL AND EDUCATIONAL CHANGE**
**(A Company Licensed under Section 8 of the Companies Act, 2013)**
**CIN: U74999MH2014NPL257528**
**Statement of Income and Expenditure for the year ended March 31, 2025**

**Amount In Rupees**

| Particulars | Note No | 2024-25 | 2023-24 |
|---|---|---|---|
| **I.INCOME** | | | |
| a. Revenue from operations | 9 | 89,43,779 | 68,04,180 |
| b. Other Income | 10 | 3,80,577 | 2,34,197 |
| **Total Revenue (a +b)** | | **93,24,356** | **70,38,377** |
| **II. EXPENDITURE:** | | | |
| Expenses on the Objects | 11 | 58,17,525 | 40,84,823 |
| Cost of Material | | - | - |
| Employee benefit expense | 12 | 26,32,680 | 22,36,585 |
| Administration expenses | 13 | 4,616 | 8,292 |
| Depreciation and amortization expense | | 33,531 | 61,284 |
| Finance Cost | 14 | 7,646 | 5,539 |
| Other expenses | 15 | 35,168 | 69,710 |
| **Total Expenditure** | | **85,31,166** | **64,66,233** |
| **Excess of Income over Expenditure/(Expenditure over Income)** | **(I-II)** | **7,93,190** | **5,72,144** |

**FOR UNNATI INSTITUTE FOR SOCIAL AND EDUCATIONAL CHANGE**

**Hemangi Joshi**
**Director**
**DIN No. 06607483**
**Place: Mumbai**

**Mohan Dadaji Surve**
**Director**
**DIN No. 07897064**
**Place: Mumbai**

**For Borgaonkar & Co.**
**Chartered Accountants**
**(Registration No. 145919W)**

**Rohan R. Borgaonkar**
**Partner**
**(Membership No. 179816)**

BORGAONKAR & COMPANY CHARTERED ACCOUNTANTS FRN No. 145919W KALYAN

**Date: 22-09-2025**
**Place: Kalyan**
**UDIN - 25179816BMOEXQ8468**

Unnati Institute For Social & Educational Change CIN U74999MH2014 NPL257528

# OUR SUPPORTERS & PARTNERS

Wipro Applying Thoughts in Schools

EMpower

Build A School in India

Gebbs Health Care Solution Private Ltd.

# DONATE US

OUR BANKER:
Punjab National Bank, M. G. Road, Thane (West) Mah. 400602
Account Name: UNNATI INSTITUTE FOR SOCIAL AND EDUCATIONAL CHANGE
Savings Ac No.: 3739 0001 0064 2890
IFSC : PUNB0373900

QR code for donations

https://unnati-isec.org/

# CONNECT WITH US

**प्रशासकिय कार्यालय:**

**उन्नती संस्था**
**४०२, निसर्ग कृपा,**
**सुयोग मंगल कार्यालयाजवळ,**
**टिळक नगर, डोंबिवली पूर्व, ४२१२०१**
**महाराष्ट्र.**

unnati.isec@gmail.com

https://www.facebook.com/UNNATIFOREDUCATION?mibextid=ZbWKwL

98921 03371